Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-३/3629
दि.-१३/०७/२०१८

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण, स्व-विकास व कलारसास्वाद, संरक्षणशास्त्र/स्काऊट-गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या विषयांच्या मान्यतेबाबत.**

संदर्भ:- १.जा.क्र.मराशैसंप्रप/अविवि/इ.१०वी विषय योजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३३ दि.१४/०६/२०१८
२.कोल्हापूर विभागीय मंडळाचे क्र.कोविमं/डीपी/मान्यता/८५४ दि. ०७/०७/२०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आरोग्य व शारीरिक शिक्षण, स्व-विकास व कलारसास्वाद, संरक्षणशास्त्र/स्काउट-गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या विषयांस प्रचलित पध्दतीनुसारच मान्यता देण्यात यावी किंवा कसे? याबाबत कोल्हापूर व अन्य विभागीय मंडळांनी मार्गदर्शन मागविले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१०वी साठी पुनर्रचित अभ्यासक्रम व नवीन पाठयपुस्तके याबाबत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,(बालभारती) पुणे यांचेमार्फत कार्यवाही झाली आहे. त्या अनुषंगाने शालेय प्रमाणपत्र व श्रेणी विषयांची पुनर्रचना करुन विषयात खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

अ) शालेय श्रेणी अनिवार्य विषयांमध्ये आरोग्य व शारीरिक शिक्षण,स्व-विकास व कलारसास्वाद या विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

ब) शालेय श्रेणी वैकल्पिक विषयांमध्ये संरक्षणशास्त्र/ स्काऊट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/ एन.सी.सी. या विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

उपरोक्त विषयांना मंडळाची विषय मान्यता दयावी किंवा कसे, याबाबत विभागीय मंडळामध्ये संभ्रम असल्याचे दिसून येते. सबब याबाबत स्पष्ट करण्यात येते की, सदर विषयांच्या मान्यतेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. आरोग्य व शारीरिक शिक्षण तसेच स्व-विकास व कलारसास्वाद हे दोन श्रेणी विषय अनिवार्य असल्यामुळे सदर विषयांना मंडळाची स्वतंत्र विषय मान्यता देण्याची आवश्यकता नाही वा त्यासाठी शुल्क आकारण्यात येऊ नये.

२. श्रेणी विषयात वैकल्पिक विषय म्हणून संरक्षणशास्त्र/ स्काऊट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या वैकल्पिक विषयांपैकी यापूर्वी मान्यता नसलेले विषय शाळा सन २०१८-१९ या वर्षात वा त्यापुढे नव्याने चालू करणार असतील तर त्यांच्या मागणीनुसार प्रचलित पध्दतीप्रमाणे मंडळाची विषय मान्यता देण्यात यावी व त्यासाठी विहीत शुल्क आकारण्यात यावे.

वरीलप्रमाणे शालेय श्रेणी विषय मान्यतेबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळास सादर करण्यात यावा.

प्र. सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४

---

पत्र कमांक : नाविमं/प.मा/मान्यता/ 2663
नागपूर, दिनांक : 17.07.2018
18

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग, नागपूर

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रानुसार विषय मान्यतेची कार्यवाही करण्यात यावी.

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ नागपूर